कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/हिंसंवि/२०२५-२६/१६०१
दि. ०३/१०/२५

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीच्या हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभागातर्फे शारदोत्सवानिमित्त, "प्रतिभा" ही संगीत सभा कला अकादमीच्या कृष्णकक्षात संपन्न झाली. दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी सर्वप्रथम सकाळी ठिक ११.३० वाजता सरस्वती पुजन करण्यात आले यावेळी संगीत विभागातील व कला अकादमीतील सर्व कर्मचारी उपस्थित होते. त्यानंतर महिलांनी सकाळच्या सत्रात फुगडया सादर केल्या दुपारच्या सत्राची सुरुवात ठिक २.३० वाजता झाली. त्यामध्ये सर्वप्रथम सत्यनारायण कळंगुटकर, कु. मुक्ता मिसर, सदानंद झो, राज्ञी फळदेसाई, वंशीका प्रियोळकर यांनी सुगम संगीताचा कार्यक्रम सादर केला. त्यानंतर कु. अनुश्री कोली व तृप्ती दळवी यांनी कर्नाटकी गायन सादर केले व त्यांना रोहित फळगांवकर व निशा कुंडईकर यांची मृदंगमची साथसंगत लाभली. गायनाच्या कार्यक्रमानंतर यश आपटे व अर्थव गायक यांचे बासरीवादन झाले. त्यानंतर तबला सहवादनाचा कार्यक्रम झाला. त्यामध्ये कु. शुभम आपुले, शिवम तळवणेकर, प्रज्योत गावस, देवानंद नाईक, अशांक माजिक, शिवांक च्यारी, दक्ष ठाकर व आरव परब हे विद्यार्थी सहभागी झाले होते. संवादिनीवादनाच्या कार्यक्रमात कु. सोहम कुट्टीकर, विवेक गावस यानी अभंगांचे सादरीकरण केले. व यतिश तळणकर यांनी ताल तीन तालात राग वृदावनी सारंग सादर केला.

त्यानंतर कथ्थक नृत्याच्या कार्यक्रमात उमा नाईक, कु. रिधीमा वेंगुर्लेकर, कु. गौरक्षा साळसकर, कु. पियु निमकर, साक्षी देशपांडे, तनिशा आमोणकर, तानिया चोपडेकर, वरदा चव्हाण, आरुनी प्रभू ह्या विद्यार्थिनींनी कथ्थक नृत्य सादर केले. त्यानंतर भरतनाटयम् नृत्य सादर करण्यात आले. त्यामध्ये कु. प्रतिका मराठे, जानवी म्हांबरे, अनुश्री कोली, मुस्कान खानोलकर, कु. तृप्तीदळवी, अमीषा अडकोणकर, चैत्राली काला नागा, श्रृती खोर्जुवेकर, शिल्पा के, मंजिरी फुटणकर, निधी नाईक शिरोडकर, इच्छा नाईक, नेहाली किनळकर, आभा नाडकर्णी, श्रव्या शेट, आरोही सुभेदार, गिना पाडगांवकर, इशीता शेटकर, वरालीका पिसुलेकर, शताक्षी फळगांवकर ह्या विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. व शेवटी कार्यक्रमाचा समारोप सतारचे व्याख्याते श्री. सदानंद आमोणकर यांच्या सतारवादनाने झाला. त्यामध्ये त्यानी मध्यलय तीन तालात राग भिन्न षड्ज सादर केला.

गायन–वादन नृत्याच्या कार्यक्रमासाठी सर्व कलाकारांना श्री. शैलेश गांवकर, श्री. सूरज मोरजकर, श्री. भार्गवराम गर्दे व श्री. श्रीपाद च्यारी यांची तबला साथसंगत तर श्री. शुभम नाईक यांची संवादिनी साथसंगत लाभली. तर कु. वसंत च्यारी, गोविंदा फडते यांनी मंजिरी साथसंगत केली. भरतनाटयम नृत्यासाठी डॉ. सपना नाईक व सौ. मंदिरा तिरोडकर या नटवंगमची साथ केली असून विद्वान श्री. डि. आर. चेथनमुर्ती यांची मृदंगमची साथसंगत व डॉ. दिप्ता रुबसुंदरम् यांची गायन साथसंगत विद्यार्थ्यांना लाभली.

संपूर्ण कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सौ. वरदा बेडेकर व सौ. मंदिरा तिरोडकर यांनी केले व शेवटी सौ. वरदा बेडेकर यांनी सर्वांचे आभार मानले. संपूर्ण दिवसाच्या कार्यक्रमासाठी सर्व पालक व रसिक श्रोते मोठया संख्येने उपस्थित होते.

हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभाग
कला अकादमी गोवा

प्रति

१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड

७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)